Govt permission - A&F

शैक्षणिक वर्ष २०११ -१२
अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात
नवीन अभ्यासक्रम / विषयांना मान्यता

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
शासन आदेश क्रमांक एनजीसी २०११/(२३० /११)/मशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २२ नोव्हेंबर, २०११

**पहा**:- १. मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे पत्र क्र.संलग्नता/मान्यता-२/१९७९/२०११, दि. २९.४.२०११.
२. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे पत्र क्र. संलग्नता/टी-२/व्हीआयजे-१६२९७, दि. २९.४.२०११.

**शासन आदेश**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८३(५) नुसार, ८२(४) प्रमाणे तसेच शासन निर्णय दिनांक ३.८.२०११ नुसार राज्यातील विद्यापीठांनी अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम / विषय मान्यतेसाठीचे प्रस्ताव शासनास सादर करावयाचे असतात, त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०११-१२ साठी राज्यातील विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावास विद्यापीठाच्या शिफारशी विचारात घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(५) व ८३(५) व शासन निर्णय दि. ३.८.२०११ अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयामध्ये पुढील विवरणात नमूद केल्यानुसार नवीन अभ्यासक्रम / विषयांस खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे / महाविद्यालयाचे नाव | मान्यता दिलेले नवीन अभ्यासक्रम/विषय |
|---|---|---|
| **मुंबई विद्यापीठ, मुंबई** | | |
| १. | श्री. विलेपार्ले केळवाणी मंडळाचे मिठीबाई कॉलेज ऑफ आर्ट्स, चौहान इन्स्टिटयुट ऑफ सायन्स आणि अमृताबेन जीवनलाल कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स,विलेपार्ले, मुंबई | बी.एम.एम.(इंग्रजी) |
| २. | श्रीमती श्यामपतीदेवी मिश्रा एज्युकेशनल ट्रस्ट, श्री. जी.पी.एम. डिग्री कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, अंधेरी (पू), मुंबई. | बी.एम.एम. |
| ३. | डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळ, के.व्ही. पेंढारकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, डोंबिवली (पू), ठाणे | बी.कॉम. (अकाउटींग ॲण्ड फायनॉन्स) |
| ४. | श्री. सुधीर माधवजीलाल वेल्फेअर आणि एज्युकेशन ट्रस्ट, दी लॉर्ड्स युनिवर्सल वाणिज्य विज्ञान आणि मॅनेजमेंट महाविद्यालय, दप्तरी रोड, मालाड (पू), मुंबई | बी.कॉम. (अकाउटींग ॲण्ड फायनॉन्स) |
| **शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** | | |
| ५. | विश्वास शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली, देशभक्त आंनदराव बळवंतराव नाईक आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज यशवंतनगर, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली. | कॉम्प्युटर सायन्स (स्पेशल) (बी.एस्सी. भाग-१) |

C:\Documents and Settings\dsa\Desktop\BJ\2011-12\G R new\new course 220.11.doc

I/C Principal
DSPM' S K. V. Pendharkar College
Dombivli
TRUE COPY

G70
8/24/11

अटी व शर्ती:-

१. अस्तित्वात असलेल्या ज्या महाविद्यालयात अभ्यासक्रम / विषय मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या महाविद्यालयाने त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे विना अट हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टॅंप पेपरवर सादर करावे.

२. संबंधित विभागीय सहसंचालकांचे हमीपत्र सादर केल्याविषयीचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय विद्यापीठांने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

३. विद्यापीठाने विहित केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी, अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असून इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकानी करावी व तद्नंतरच उपरोक्त अट क्रमांक २ मधील प्रमाणपत्र विद्यापीठास द्यावे.

४. महाविद्यालयांने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

५. नवीन अभ्यासक्रम/ विषय मंजूर करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी ज्यांची स्थापना होऊन ५ वर्ष झालेली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची ५ वर्ष पुर्ण झालेली नाहीत त्यांची ५ वर्ष पुर्ण होताच एक वर्षात NAAC ॲक्रिडियेशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळवल्यास सदर अभ्यासक्रम / विषयाची मान्यता आपोआप रद्द होईल.

६. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ८२ (५) व ८३ (५) नुसार ही मान्यता शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून देण्यात येत आहे.

२. विद्यापीठाचे संलग्निकरण देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही विद्यापीठांनी करण्यापूर्वी शासनाच्या मान्यतेबाबतचे आदेश शासनाच्या संकेतस्थळावर अवलोकन केल्याशिवाय व विभागीय सहसंचालकाचे प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरु करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना पाठवावा.

३. संबंधीत विद्यापीठांनी व विभागीय सहसंचालकांनी नवीन अभ्यासक्रम / विषयांबाबतचा नियतकालिक आढावा घेवून सदर अभ्यासक्रम/विषयांसाठी मंजूर विद्यार्थी संख्येच्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर अभ्यासकम / विषय रद्द समजून तसे शासन व विद्यापीठाच्या माहितीने विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत.

४. हे आदेश, राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११११०१११०३३२००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ग.सं.कचरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) कुलसचिव, मुंबई व कोल्हापूर विद्यापीठ.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई, पनवेल, कोल्हापूर
४) संबंधित संस्था,
५) निवड नस्ती (मशि-४)

C:\Documents and Settings\dsa\Desktop\BJ\2011-12\G R new\new course 220.11.doc

To
Mrs Kokane (laminate and file it)
Take xerox
and issue copy to
all HoD

# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक

### उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.
दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०.
ई-मेल पत्ता :- jdhekvp@Rediffmail.com

दिनांक: 24 APR 2012

ज. क्र. सहसं/उशि/कोविप/मशि.१/विअनु/२०१२/४६६

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळ, संचालित के. व्हि. पेंढारकर महाविद्यालय, डोंबिवली (पू), जिल्हा–ठाणे येथे शासन आदेश क्र. एनजीसी २०११/(२३०/११)/मशि–४, दि. २२.११.२०११ नुसार बी.कॉम अकाउंटींग ॲण्ड फायनान्स या नवीन अभ्यासक्रम विषयांच्या अभ्यासक्रमास सन २०११–१२ या शैक्षणिक वर्षापासून उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील क्र. १ ते ६ प्रमाणे अटी व शर्तींना अनुसरुन कायम विना अनुदानित तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. शासन निर्णयातील अटी व शर्तीप्रमाणे संस्था महाविद्यालयाकडून रु. १००/– च्या भारतीय गैरन्यायिक मुद्रांक पेपरवर उपरोक्त अभ्यासक्रम/महाविद्यालय/विद्याशाखा/तुकडी/विषय चालविण्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणत्याही अनुदानाची आर्थिक मागणी केली जाणार नाही. असे हमीपत्र महाविद्यालयांकडून दि. २२.०३.२०१२ अन्वये शासन निर्देशाप्रमाणे या कार्यालयाकडे सादर केलेले आहे. हमीपत्र विलंबाने सादर केले असल्याने विद्यापीठ स्थरांवर विद्यार्थी नोंदणी न झाल्यास अथवा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया गेल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्यावर सर्वस्वी अवलंबून राहील या अटीवर तसेच "महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४" अंतर्गत तरतुदींनुसार मर्यादित विद्यार्थी प्रवेश तसेच प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या विगतवारीसह नियतकालिक आढावा, नॅक ॲक्रिडीएशन बाबत करावयाची कार्यवाही आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक अर्हताधारक अध्यापक वर्ग आणि अर्हताधारक व अनुभवी शिक्षकेतर कर्मचारी वर्ग नियुक्त करण्याच्या अधिन राहून शासन निर्णयातील सूचनांप्रमाणे विद्यापीठाने या संस्थेच्या / महाविद्यालयाच्या वर उल्लेखित नवीन महाविद्यालय / विषय / तुकडी / विद्याशाखा / अभ्यासक्रमासाठी पुढील सलग्नीकरणाची प्रक्रिया सुरु करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.

TRUE COPY

B. Bhadane 17/4/12

विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल (जि. रायगड)

स्थळ :– पनवेल, जिल्हा– रायगड.
दिनांक :– 24 APR 2012

प्रत :-

१. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई -३२ / एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई - २० त्यांना सूचित करण्यात येते की, विद्याशाखांत विविध विद्यापीठांनी त्यांच्या संलग्निकरणात येत असलेल्या या महाविद्यालयाच्या वर्गात मंजूरी मिळालेल्या अभ्यासक्रमांत आवश्यक असणा या शैक्षणिक शुल्क, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या भौतिक सुविधा, पात्रताधारक अध्यापक वर्ग व तत्सम स्वरुपाच्या बाबी पूर्ण करण्याच्या सूचना, तसेच **बार कौंसिल ऑफ इंडिया, एन.सी.टी.ई / ए.आय.सी.टी.ई., नॅक यांचेकडील ना- हरकत प्रमाणपत्र तात्काळ प्राप्त करण्याच्या सूचना पुनश्च: उपरोक्त संस्थेच्या निदर्शनास आणुन द्याव्यात.**

2. उपरोक्त मान्यता नवीन महाविद्यालय/ अभ्यासक्रम/ विद्याशाखा/ विषय/ तुकड्या सुरु करण्यात आलेल्या महाविद्यालयांना **ज्यांची स्थापना होऊन ५ वर्ष झाली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची ५ वर्षे झालेली नाहीत त्यांची ५ वर्षे पूर्ण होताच एक वर्षात नॅक ॲक्रिडिएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळविल्यास सदर विद्याशाखा मान्यता आपोआप रद्द होईल.** तसेच शासन निर्णयानुसार कळविण्यात आल्याप्रमाणे शासनाने दिलेल्या अटी व शर्ती यांचे पालन होते किंवा नाही याबाबत खात्री करुन संलग्निकरणाचा अहवाल शासनास व संचालनालयास पाठवून केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाठवावी.

I/C Principal
DSPM' S K.V. Pendharkar College